| | |
|---|---|
| दाखल दिनांक : | २१/१०/२०२४ |
| नोंदणी दिनांक : | २१/१०/२०२४ |
| निकाल दिनांक : | **११/०३/२०२६** |
| कालावधी : | ०१ व.०४ म.१८ दि. |

भाग-'अ'

**Form No. XXXII**

**(Title Page of the Judgment)**

**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, खामगाव, जि. बुलढाणा यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी - एफ.टी. शेख)

| | |
|---|---|
| नियमित फौजदारी खटला क्र.४८६/२०२४ | अपराध क्र.९१/२०१५ |
| **CNR NO. MHBU060022852024** | निशाणी क्र.३२९ |

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस हेडकॉन्स्टेबल मनोहर सापुर्डा गोरे,<br>खामगाव शहर पोलिस ठाणे,<br>ता.खामगांव, जि. बुलढाणा. |
| द्वारे प्रतिनिधित्व | सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता कु. पिंकी नारायणदास पेशवानी. |

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:11:17 +0530

| | |
|---|---|
| आरोपी | १.शेख आसिफ शेख मुस्ताक ,<br>वय-४३ व्यवसाय- मजुरी<br>राहणार- खामगाव कोठारी फैल,<br>ता. खामगाव,जि. बुलढाणा<br>२. जरीनाबी शेख मुस्ताक,<br>वय-६४ व्यवसाय- घरकाम,<br>राहणार- खामगाव कोठारी फैल,<br>ता. खामगाव,जि. बुलढाणा<br>३. नसरीन परवीन शेख मुस्ताक,<br>वय-४० व्यवसाय- घरकाम,<br>राहणार- खामगाव कोठारी फैल,<br>ता. खामगाव,जि. बुलढाणा |
| द्वारे प्रतिनिधित्व | आरोपी तर्फे अधिवक्ता श्री.मोहम्मद अर्शद. |

| | |
|---|---|
| दोषारोप | भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४,३२३,५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. |

## भाग-'ब'
## (Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| (१) | घटना घडल्याचा दिनांक | दिनांक २३/०६/२०२४ |
| (२) | प्रथम खबर अहवाल दिनांक | दिनांक २३/०६/२०२४ |
| (३) | दोषारोप दाखल झाल्याचा दिनांक | दिनांक १५/१०/२०२४ |

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:11:25 +0530

| | | |
|---|---|---|
| **(४)** | दोषारोप निश्चिती दिनांक | दिनांक २१/०७/२०२५ |
| **(५)** | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | दिनांक २०/०८/२०२५ |
| **(६)** | न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली दिनांक | निरंक |
| **(७)** | न्यायनिर्णयाचा दिनांक | दिनांक ११/०३/२०२६ |
| **(८)** | शिक्षेची तारीख, जर असेल तर | नाही. |

<u>आरोपीचा तपशिल</u>

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनवर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | फौ. प्र.सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेख आसिफ शेख मुस्ताक | २१.०९.२०२४ | २१.०९.२०२४ सूचना पत्रावर सोडले | भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३ ५०४ व ५०६,३४ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | जरीनाबी शेख मुस्ताक | ” | ” | ” | ” | ” | ” |
| ३. | नसरीन परवीन शेख मुस्ताक | ” | ” | ” | ” | ” | ” |

<u>भाग-'क'</u>

<u>**(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)**</u>

सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:11:32 +0530

## अ-सरकारी साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | इरफान खान शौकत खान | २१ | तक्रारदा |

## ब-बचावपक्ष साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क-न्यायालय साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशाणी

## अ-सरकारी

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | तोंडी रिपोर्ट वरचे तक्रारदाराच्या सहीला | २२ |
| २. | एफ. आय .आर वर चे तक्रारदाराच्या सहीला | २३ |
| ३. | तक्रारदाराचे मुलाचे वैद्यकीय मेमोला | २४ |
| ५. | घटनास्थळ आणि जप्ती पंचनामेला | २५ व २६ |
| ६. | तक्रारदाराने पुरावा बंद करण्याकरिता दिलेली पुरसीसला | २७ |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:11:39 +0530

ब-बचावपक्ष

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क-न्यायालय

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड-जप्त मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १८४/२०२४ खामगाव शहर पोलीस ठाणे | एक आडजात काठी किंमत शून्य. |

न्या य नि र्ण य
**(दि. ११/०३/२०२६)**

भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४,३२३,५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये आरोपी खटल्यास समोर गेले आहेत.

२. सरकारपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे अशी आहे की, दिनांक २३.०६.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास खामगाव कोठारी फैल,तालुका. खामगाव, जिल्हा. बुलढाणा

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH Date: 2026.03.11 15:11:47 +0530

येथे तक्रारदार, संडासला बाहेर गेलो असता, त्याची पत्नी घरी एकटी असताना, सर्व आरोपी तिथे आली होती व त्यांनी पैशाच्या कारणावरून तक्रारदाराच्या पत्नीला शिवीगाळ दिली होती.सर्व आरोपींनी तक्रारदाराच्या पत्नीला चापट बुक्क्यांनी मारहाण केली होती. तक्रारदार घरी आल्यानंतर त्याच्या पत्नीने त्याला सांगितले म्हणून तक्रारदार व त्याची पत्नी आरोपींच्या घरी असे का केले म्हणून विचारण्यात गेली असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली तसेच आरोपी शेख आसिफ शेख मुस्ताक यांनी त्याच्या हातातील लाकडी काठीने तक्रारदाराचे उजव्या खांद्याच्या पाठीमागे मारहाण करून जखमी केले होते. सर्व आरोपींनी तक्रारदाराला व त्याच्या पत्नीला चापट बुक्क्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली होती.म्हणून तक्रारदाराने खामगाव शहर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध तक्रार दिली होती.सदरच्या तक्रारीवरुन आरोपी विरुध्द गुन्हा क्र.३२९/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४ व ५०६- भाग-२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंद झाला.

३. सदर गुन्ह्याचा तपास, तपासीअंमलदार पोलीस हेडकॉन्स्टेबल मनोहर सापुर्डा गोरे यांनी केला. तपासी अंमलदाराने दिनांक २३/०६/२०२४ रोजी घटनास्थळावर जावून दोन पंचांसमक्ष

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:11:54 +0530

घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच तपासी अंमलदाराने जप्ती पंचनामा करून गुन्ह्यात वापरलेला एक आडजात काठी जप्त केली. तपासीअंमलदाराने ०४ साक्षीदारांचे बयाण नोंद केले.दिनांक २१.०९.२०२४ रोजी तपासीअंमलदाराने आरोपींना अटक केली आणि त्याच दिवशी न्यायालयाने आरोपींना जामीन वर सोडून दिले. तपासीअंमलदाराने तपास पुर्ण करुन दोषारोपपत्र आरोपी विरुध्द सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, खामगाव यांच्या न्यायालयात दाखल केले.

४. आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४,५०६ भाग-२ सह कलम ३४ अन्वयेचे दोषारोप ठेवण्यात आले व त्यांना अपराधाचा तपशिल सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली नाही व संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. आरोपींनी त्यांच्या बचावामध्ये सांगितले की, त्यांच्यावर खोटी केस दाखल केली आहे.

५. खालील मुद्दे माझ्या विचारार्थी निघाले आहेत. त्यावरुन माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर |
|---|---|---|
| १. | सरकारपक्षाने शाबीत केले काय की, दिनांक | |

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:12:02 +0530

| | | |
|---|---|---|
| | २३.०६.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास खामगाव कोठारी फैल,तालुका. खामगाव, जिल्हा. बुलढाणा येथे तक्रारदार हा आरोपींना विचारण्यास गेले असता, आरोपींनी संगणमत करून आरोपी. क्र.१ ने त्याच्या हातातील घातक हत्यार लाकडी काठीने तक्रारदाराचे उजव्या खांद्याच्या पाठीमागे मारहाण करून दुखापत पोचवली. म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला काय ? | .... नाही. |
| २. | सरकारपक्षाने शाबीत केले काय की, सरकारपक्षाने शाबीत केले काय की, वर नमुद ठिकाणी, वेळी व स्थळी आरोपींनी संगणमत करून तक्रारदार व त्याच्या पत्नीला चापट भुक्क्यांनी मारहाण करून दुखापत पोचवली. म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला काय ? | .... नाही. |
| ३. | सरकारपक्षाने शाबीत केले काय की, वर नमुद ठिकाणी, वेळी व स्थळी आरोपींनी संगणमत करून आरोपींनी इच्छापूर्वक तक्रारदाराला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन त्याला सार्वजनिक शांतता भंग करण्यास प्रक्षोभित केले. म्हणुन आरोपीने भा.दं.वि. कलम ५०४ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | .... नाही. |
| ४. | सरकारपक्षाने शाबीत केले काय की, वर नमुद ठिकाणी, वेळी व स्थळी आरोपींनी संगणमत करून आरोपींनी | |

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:12:09 +0530

| | | |
|---|---|---|
| | तक्रारदाराला जिवाने मारण्याची धमकी देवून फौजदारी धाकधपटशाचा गुन्हा केला. म्हणुन आरोपीने भा.दं.वि. कलम ५०६ भाग-२ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला काय ? | ...नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. |

<u>कारणमिमांसा</u>

६. सरकारपक्षाने आरोपींचे दोषारोप सिध्द करण्याकामी पंच साक्षीदार आणि तक्रारदाराला तपासले . परंतु ते फितूर झाले.तसेच तक्रारदाराने पुरावा बंद करण्याकरिता निशाणी क्रमांक.२७ वर पुरसीस दिली असल्यामुळे,सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द सबळ पुरावा नसल्यामुळे आरोपींची जबानी, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये नोंद करण्यात आले नाही. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर</u> **:-**

(वरील सर्व मुद्यांचे संदर्भात सरकारपक्षाचा पुरावा विचारात घेता चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वरील मुद्दे एकत्रीत चर्चीले आहेत.)

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:12:16 +0530

७. सरकारपक्षाने आरोपीचे आरोप शाबीत करण्याकरिता तक्रारदार इरफान सा.क्र.२ ला तपासले असता, त्याने साक्षी दिली की, घटना कधी झाली होती त्याला आठवत नाही. आरोपी त्याचे नातेवाईक आहे म्हणून तो त्यांना ओळखतो. त्याच्या पत्नीने आणि ननंद मध्ये झाडू मारण्याच्या कारणावरून बोलचाल झाली होती या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. त्याने रागाच्या भरात आरोपींविरुद्ध तक्रार दिली होती. तक्रारदार सरकारपक्षाला मदत करीत नसल्यामुळे, सरकार पक्षाने त्याला उलटतपासले असता, तक्रारदाराने सरकार पक्षाने विचारलेले सर्व विधाने नाकारले. तक्रारदाराने साक्षी दिली की, त्याला आरोपींनी लाकडी काठीने मारहाण केली नव्हती, तसेच त्याला व त्याच्या पत्नीला चापट बुक्क्यांनी मारहाण केली नव्हती आणि शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिली नव्हती.

८. तक्रारदाराच्या साक्षीवरुन ही बाब निष्पन्न होते की, तक्रारदारा सरकारपक्षाला मदत करित नाही. त्याची साक्ष विश्वासआर्य नाही. त्यामुळे मी, या मताशी येत आहे की, तक्रारदारा फितुर झालेली आहे. म्हणुन सरकार पक्ष तक्रारदाराच्या मदतीने तक्रार शाबीत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:12:24 +0530

करण्यास असमर्थ ठरला आहे.

**९.** सरकारपक्षाने आरोपीचे आरोप शाबीत करण्याकरिता घटनास्थळ पंच साक्षीदार सैय्यद असद सा.क्र.१ ला तपासले असता, त्याने साक्षी दिली की, त्याच्या समोर पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला नव्हता. या साक्षीदाराला सरकारीवकिलाने उलटतपासले असता, उलटतपासात ही या साक्षीदाराने सांगितले की, त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा करण्यात आला नव्हता. या साक्षीदाराच्या साक्षावरून ही बाब दिसून येते की, घटनास्थळ पंच साक्षीदार फितूर झालेला आहे. म्हणून सरकार पक्ष त्याच्या मदतीने घटनास्थळ पंचनामा शाबित करू शकला नाही.

**१०.** सरकारपक्षाने तक्रारदाराला आणि पंच साक्षीदाराला तपासले .परंतु ते फितुर झालेली आहे . तसेच तक्रारदाराने पुरावा बंद करण्याकरिता निशाणी क्रमांक.२७ वर पुरसीस दिली, असल्यामुळे सरकार पक्षाचा पुरावा निशाणी क्रमांक.१ अन्वये आदेश पारित करून बंद करण्यात आला. तक्रारदार आणि पंच साक्षीदारा फितूर झालेली,

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:12:33 +0530

असल्यामुळे अभिलेखावर आरोपीं विरुध्द सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे सरकारपक्ष आरोपीं विरुध्द लावलेले गुन्हे शाबीत करु शकला नाही. म्हणुन आरोपी वर नमुद गुन्ह्यामधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मी **मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी** देत आहे.

मुद्दा क्र.५ चे उत्तर -

**११.** आरोपी विरुध्द आरोप शाबीत झालेले नाही. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्याचप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येत आहे. जप्त केलेला मुद्देमाल एक आडजात काठी किंमत शून्य असल्यामुळे, जप्त मुद्देमालाला अपील कालावधी संपल्यानंतर, नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे.

**१२.** त्याचप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

१. आरोपी क्रमांक.१ ते ३ यांना भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४ व ५०६ भाग-२ सह ३४ च्या गुन्ह्यामधून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:12:41 +0530

२. आरोपींनी दिलेले जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात आले.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ अन्वये आरोपींनी अपिल न्यायालयासमोर हजर राहण्याकरिता वैयक्तीक बंधपत्र रोख रक्कम रु.५०००/- चे द्यावे.

४.
जप्त केलेला मुद्देमाल एक आडजात काठी किंमत शून्य असल्यामुळे, जप्त मुद्देमालाला अपील कालावधी संपल्यानंतर, नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे.

५. त्याचप्रमाणे खटला निकाली काढण्यात यावे.

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.11 15:12:49 +0530

दिनांकः ११/०३/२०२६
ठिकाण : खामगाव

(एफ.टी.शेख)
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खामगाव, जिल्हा -बुलढाणा